# ‘‘पुस्तक पेटी उपक्रमामुळे संस्कारक्षम वाचकांना अभिव्यक्तीचे बळ मिळतेय’’



मुलाखतकार : सायली परांजपे









*शालेय विद्यार्थ्यांना पुस्तक पेटी सुपुर्द करतानाचा क्षण*

**आजकाल वाचतं कोण! हे वाक्य वारंवार कानावर पडतं. मात्र, वाचनाचं प्रमाण का कमी झालं असावं, ते वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे का आणि असेल तर ते प्रयत्न कोणत्या स्वरूपात करता येतील यावर विचार आणि कृती होणं महत्त्वाचं आहे. वाचनाची संस्कृती जोपासण्यासाठी, वाढवण्यासाठी अर्थातच अनेक स्तरावरून प्रयत्न सुरूही आहेत. सरकारी स्तरावरून चाललेल्या प्रयत्नांसोबतच वैयक्तिक किंवा सामुदायिकपणे उपक्रम राबवले जात आहे. महानगरांच्या तुलनेत निमशहरी–ग्रामीण भागात हे उपक्रम जास्त तळमळीने चालवले जात असावेत. ‘पुस्तकं मुलांच्या हाती’ या अशाच एका उपक्रमाबद्दल तो राबवणारे अभिजित जोंधळे यांच्याशी साधलेला हा संवाद...**

**‘वाचाल तर वाचाल’ हे वचन मुलांपुढे अनेकदा उद्‌धृत केलं जात असलं, तरी त्यांना वाचनाची गोडी लावण्यासाठी काही ठोस प्रयत्न आवश्यक असतात. याच उद्देशाने आपण गेल्या दहा वर्षांपासून ‘पुस्तक पेटी’ हा उपक्रम राबवत आहात. मुळात या उपक्रमाची कल्पना कशी सुचली?**

अंबाजोगाईत माझं अनुराग पुस्तकालय हे दुकान २००५ सालापासून आहे. वाचक पुस्तकांचा शोध घेत येण्याची वाट बघण्यापेक्षा त्यांच्यापर्यंत पुस्तकं पोहोचवण्याचे प्रयत्न मी मित्रमंडळींच्या मदतीने बऱ्याच वर्षांपासून करतच होतो. राज्यात अनेक जिल्ह्यांच्या ठिकाणीही साहित्यविषयक पुस्तकांचं दुकान नाही पण अंबाजोगाईसारख्या तालुक्याच्या शहरात आम्ही चांगलं साहित्य गेली २० वर्षं उपलब्ध करून देत आहोत. शिवाय, बुक क्लब्ज, वाचनकट्टे, लेखक आपल्या भेटीला असे वाचनाला प्रोत्साहन देणारे उपक्रम राबवले जातात. शब्दोत्सव नावाचा दिवाळी अंकही आम्ही काढतो.

अंबाजोगाई परिसरात कामाच्या निमित्ताने शाळांना भेटी देत असताना ग्रंथालयांची आणि प्रयोगशाळांची अवस्था फारच वाईट असल्याची जाणीव प्रकर्षाने झाली होती, संबंधित लोक त्याबाबत उदासीन होते. त्यामुळे आपण काही करू शकतो का, हा विचार डोक्यात असायचा. २०१४ मध्ये ‘शब्दोत्सव’मधल्या 'वेगळ्या वाटेचे प्रवासी' या सदराच्या निमित्ताने नाशिकच्या कुसुमाग्रज प्रतिष्ठानाचे विनायक रानडे यांची मुलाखत घेण्याची संधी मिळाली. ते राबवत असलेल्या पुस्तकपेटी या उपक्रमाबद्दल सविस्तर समजून घेता आलं. अशाच पद्धतीचं काम आपल्याला अंबाजोगाईत करता येईल का, असा विचार मनात आला. अर्थात ते सगळ्या वाचकांसाठी पुस्तक पेटीची कल्पना राबवत होते. मी मुलांवर लक्ष केंद्रित करण्याचं ठरवलं. कारण, आमच्या भागात शाळांमध्ये ग्रंथालयांची स्थिती वाईट असल्याचं दिसत होतं. त्यामुळे या कल्पनेला चालना मिळाली. सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनाचं औचित्य साधून ३ जानेवारी २०१५ रोजी पहिली पुस्तक पेटी आम्ही एका शाळेत पोहोचवली.

**‘पुस्तकपेटी’ या उपक्रमाचं नेमकं स्वरूप कसं आहे?**

पुस्तकपेटी हा उपक्रम मुलांसाठी राबवताना सुरुवातीला शाळांतल्या इयत्तांचा विचार करून बालवाडी ते चौथी, पाचवी ते सातवी, आठवी ते दहावी असे गट तयार केले. अंबाजोगाईत आमचा एक मैत्री गट आहे. वेगवेगळ्या वयोगटातल्या मुलांना नेमकं काय वाचायला द्यावं यावर मैत्री गटातल्या सदस्यांशी चर्चा सुरू केली. गाजलेल्या बाल साहित्यापैकी काही निवडलं. पेटीत काही चरित्रं असावीत, काही कथा-कविता असाव्यात, काही विज्ञानाची पुस्तकं असावीत असा विचार होता. मुळात या पेटीतल्या पुस्तकांमध्ये शक्य तेवढं वैविध्य असलं पाहिजे, हे कायम लक्षात ठेवलं. ओरिगामीचं किंवा विनोदाचं एखादं पुस्तक त्या पेटीत आवर्जून द्यायचं ठरवलं. अशा पद्धतीने पहिली पेटी तयार झाली.

पुस्तक विक्रीच्याच व्यवसायात असल्याने नवीन पुस्तकं सतत बघितली जातात. त्यात बाल साहित्याकडे विशेष लक्ष आम्ही ठेवतो. नवीन पुस्तकं मागवतो, चाळून बघतो. मुलांनी काय वाचलं पाहिजे, याबाबत बाल शिक्षणाच्या क्षेत्रात काम करणाऱ्यांचा सल्ला घेतो. अनेक साहित्यिकांनी पुस्तकांच्या याद्या पाठवल्या. मध्यंतरी एकच पुस्तक इंग्रजी आणि मराठीत अशी द्वैभाषिक पुस्तकं आली होती. ती आवर्जून घेतली.

पुण्यातले मित्र रवि जैन यांच्याशी सहज या कल्पनेबद्दल बोललो होतो. जेव्हा केव्हा पहिली पेटी तयार होईल, तेव्हा ती आपण प्रायोजित करू असं त्यांनी सांगितलं होतं. आर्थिक मुद्दाही महत्त्वाचा होताच. कारण अंबाजोगाईत मोठे उद्योग वगैरे नसल्याने व्यक्तिगत संबंधांवरच हे शक्य होणार होतं. पेटी तयार करण्यापूर्वीच प्रायोजक मिळणं आमच्यासाठी आनंदाची बाब होती. अशा पद्धतीने सावित्रीबाईंच्या जन्मदिनाच्या दिवशी अंबाजोगाईपासून १०-१२ किलोमीटर अंतरावरच्या कुंबेफळ गावातल्या जयप्रभा माध्यमिक शाळेत पहिली पुस्तक पेटी दिली.

बालवाडी ते चौथी या वयोगटासाठी तयार केल्या जाणाऱ्या पेटीत साधारण ९० ते १०० पुस्तकं असतात आणि माध्यमिक शाळेच्या पेटीत सत्तरेक पुस्तकं असतात. काही पुस्तकं अगदी एक पानी, सहा पानीही असतात. लहान वयोगटासाठी ठळक, मोठ्या अक्षरांतली रंगीत पुस्तकं देतो. चित्रमय पुस्तकं या गटात बरीच वाचली जातात. शिक्षकांसाठीही आम्ही प्रत्येक पेटीत किमान पाच पुस्तकं देतो. हेरंब कुलकर्णी यांचं बखर शिक्षणाची, रेणू दांडेकर

आणि लीला पाटील यांची पुस्तकं, ‘जिथे मुलांना पंख फुटतात’सारखं अनुवादित पुस्तक आम्ही शिक्षकांसाठी देतो. सुरुवातीला आम्ही उपक्रमाला पुस्तकपेटीच म्हणायचो, नंतर आम्ही या योजनेला ‘पुस्तकं मुलांच्या हाती’ असं नाव दिलं.

पेटीचं स्वरूप साधं आहे. यात प्लास्टिकचा एक बॉक्स असतो. १०-१५ किलोमीटर अंतरातल्या शाळांमधल्या शिक्षकांना दुचाकीवर समोर ठेवून पेटी घेऊन जाता यावी, दोन मुलांना मिळून ती सहजपणे उचलून नेता यावी, अशा हिशेबाने ती प्लास्टिकची ठेवली आहे.

ही पुस्तक पेटी सहा महिने किंवा एक सत्र एका शाळेकडे ठेवावी, तेवढ्या काळात मुलांची पुस्तकं वाचून झाल्यानंतर त्यांना नवीन पेटी देऊन आधीची पेटी दुसऱ्या शाळेत पाठवावी, असं साधारण नियोजन होतं. अर्थात नियम लवचिक ठेवले. काही शाळांमध्ये पुस्तकं वाचून व्हायची असतील, तर एका सत्राहून जास्त काळही पेटी शाळेत ठेवली जाते. पहिल्या वर्षात दोन-तीन पेट्या पाठवल्या गेल्या तरी खूप झालं असं वाटत होतं, पण आणखीन काही प्रायोजक मिळाल्याने पहिल्या सत्रातच आम्ही पाच-सहा पेट्या वितरित करू शकलो.

**पुस्तक पेटी देण्यासाठी ग्रामीण भागातल्या शाळांची निवड प्राधान्याने केली का?**

नाही. ग्रामीण, शहरी असे काही निकष नव्हते. अर्थात पेटी कोणाला द्यायची याचा निकष होता. एखादं मोठं प्रायोजकत्व मिळवून शंभरेक पेट्या वाटणंही फार कठीण नव्हतं, पण आम्ही तसं केलं नाही. ज्या शाळेत पुस्तकं वाचून घेऊ इच्छिणारा शिक्षक आहे, त्याच शाळेत पेटी पाठवायची एवढीच अट ठेवली. असा शिक्षक असेल तरच पेटी पाठवायची, मग वितरणाचा वेग कमी झाला तरी चालेल हे पक्कं होतं. मग तो शिक्षक शहरी भागातला असो, ग्रामीण भागातला असो, जिल्हा परिषद शाळेतला असो किंवा खासगी शाळेतला असो. या उपक्रमाबद्दल मी सुरुवातीला फार कोणाशी बोलत नव्हतो, पण शिक्षकांच्या गटांमध्ये मात्र आवर्जून सांगत होतो. त्यातून प्रतिसाद मिळाला. कोविड साथीत लॉकडाउनचे काही महिने पेटी फिरणं बंद झालं होतं, तरीही ज्या शाळांमध्ये पेट्या आधीच पोहोचलेल्या होत्या, तिथल्या शिक्षकांनी पेटीतली पुस्तकं



*सोशल मीडियाने महानगरांपासून खेड्यांपर्यंतचे जगणे व्यापले असताना, संस्कारक्षम वयातल्या मुलांना वाचनाची गोडी लागणे महत्त्वाचे. त्यातूनच त्यांच्या कल्पनाशक्तीला, विचारक्षमतेला धुमारे फुटतात... हा विचार केंद्रस्थानी ठेऊन अभिजित जोंधळे यांनी ग्रामीण भागातल्या शाळांमध्ये पुस्तक पेटीचा यशस्वीपणे उपक्रम राबवला...*

मुलांपर्यंत पोहोचवली. त्यामुळे उपक्रम सुरू राहिला.

इयत्तावार गट केले असले तरी शाळेतल्या मुलांची वाचनाची सरासरी पातळी काय आहे, हे आम्ही शिक्षकांना विचारतो. एखाद्या शाळेत वाचनाचा दर्जा कमी असेल तर तिथे पाचवी ते सातवी गटालाही बालवाडी ते चौथीसाठी तयार केलेली पेटी आधी देतो. त्यात लवचिकता मात्र ठेवतो. म्हणजे, काही पुस्तकं छोट्या वयोगटासाठीची देत असलो तरी काही मोठ्यांचीही देतो.

२०२०-२१ नंतर इथे बीडीओ म्हणून आलेल्या समृद्धी दिवाणे-काळे यांनी हा उपक्रम समजून घेतला. त्यांनी एकत्र काय करता येईल ते विचारलं तेव्हाही, त्यांच्या तपासण्यांनिमित्त होणाऱ्या दौऱ्यांदरम्यान कृतिशील शाळा आणि शिक्षक दिसल्यास कळवण्याची विनंती मी त्यांना केली. त्यांनीही काही शाळा सुचवल्या. त्यामुळे २०-२५ नवीन शाळा जोडल्या गेल्या आहेत.

**पुस्तक पेटी वितरणाचा उपक्रम सुरू केला, तेव्हा पुढच्या किती वर्षांचं नियोजन तुम्ही केलं होतं?**

खरं तर एवढा विचार केला नव्हता. सुरुवातीला तर मी नोंदीही ठेवत नव्हतो. काही मान्यवरांनी हा उपक्रम नोंदी ठेवण्याचा सल्ला दिला. तोपर्यंत दहा-बारा पेट्या शाळांमध्ये




*कोणतीही गृहीतके न मांडता, मुलांची साधारण आवड-निवड आणि ग्रहणक्षमता ध्यानात ठेऊन पुस्तक पेटीचे वितरण होत आले आहे. अनेकदा पुस्तक पेटीत नसलेल्या पुस्तकांची मागणी होणे, यातच विद्यार्थ्यांमधल्या जिज्ञासू वृत्तीचा दाखलाही मिळत आला आहे...*

पोहोचलेल्या होत्या. मुलांपर्यंत किती पुस्तकं पोहोचत आहेत, ती किती वाचली जात आहेत, मुलांचा प्रतिसाद कोणत्या पुस्तकांना जास्त आहे अशा नोंदी ठेवण्यास मी सुरुवात केली. पहिली पाच वर्षं यावर फार बोलायचं नाही, हे मी ठरवलं होतं. वर्तमानपत्रं, सोशल मीडियावरही याबद्दल लिहिलं नाही, पण स्वत:कडे निरीक्षणं नोंदवून ठेवायला सुरुवात केली.

**वाचन तर मूलभूत बाब आहे (किंवा असावी) पण ते केवळ डोक्यात माहितीची गर्दी करण्यासाठी होऊ नये, तर त्यातून मुलांमधल्या अभिव्यक्तीला वाव मिळावा, विचारांना चालना मिळावी हा विचार या उपक्रमामागे आहे का?**

पुस्तक पेटी देणं हा फक्त पहिला टप्पा आहे, याची जाणीव सुरुवातीपासून होती. पुस्तकांच्या वितरणावर काही उपक्रम थांबतात, पण आम्ही त्याच्या पलीकडे जायचं ठरवलं. पुस्तक पेटी दिलेल्या शाळेत किंवा परिसरात पेटी दिल्यानंतरच्या दोन महिन्यात मैत्री गटाच्या सदस्याची किमान एक तरी चक्कर होते. मुलांना लेखी प्रतिसाद देण्यासाठी आम्ही प्रोत्साहन देतो. आवडलेल्या किंवा न आवडलेल्या पुस्तकाबद्दलही लिहा, त्यासाठी एखादी वही करा असं आम्ही त्यांना सांगतो, वाचलेल्या पुस्तकावर बोलायला त्यांना उत्तेजन देतो. शाळांनीही यासाठी पुढाकार घेतला. दुसरं म्हणजे, सुरुवातीच्या काळात आम्ही पुस्तक पेटीत पोस्टकार्ड टाकायचो. त्या पोस्टकार्डांवर लेखकांना, प्रायोजकांना पत्र पाठवायला मुलांना सांगायचो. त्यातून मुलांनी अनेक लेखकांना पत्रं लिहिली, त्यांची उत्तरंही आली.

पुस्तक पेटीचे प्रमुख म्हणून एक मुलगा आणि एक मुलगी यांची निवड केली जाते. ते या पेटीची काळजी घेतात. काही वेळा पुस्तकं हरवतात वगैरेही. मात्र, याबाबतीत आम्हाला फार चांगला अनुभव आला. काही पुस्तकं हरवली तर शाळेने त्यांच्या जागी आणखी चांगली पुस्तकं टाकून पेटी परत दिल्याची उदाहरणं आहेत. मुलं आपणहून पुस्तकांना कव्हर घालतात, फाटलेली पुस्तकं स्टेपल करून देतात. पेटी देताना आम्ही त्यांच्याशी गप्पा मारतो, तेव्हा पुस्तकं जपून वापरण्याचं महत्त्व सांगतो, तुमच्यासारखीच आणखी शाळांमधली मुलं या पेटीची वाट बघत आहेत, त्यांच्यासाठी आपण ही पुस्तकं नीट वापरली पाहिजेत, अशा पद्धतीने गोष्टी वाटून घेण्याचा विचार त्यांच्या मनात रुजण्यास सुरुवात होते. काही वेळा त्याच शाळेत शिकलेल्या एखाद्याने पेटी प्रायोजित केलेली असते. तेही आम्ही आवर्जून मुलांना सांगतो.

२०१९ सालानंतर आम्ही व्हॉट्सॲप ग्रुप तयार केले. शिक्षकही मग कौतुकाने मुलांचे पुस्तक वाचतानाचे फोटो, त्या पुस्तकावर बोलतानाचे व्हिडिओ पोस्ट करायला लागले. एकूण त्या उपक्रमातून एक प्रक्रिया तयार झाली. काही शाळांमध्ये आम्ही मुव्ही क्लबची कल्पनाही मांडली आहे. चांगले चित्रपट शाळेत नेऊन मुलांना दाखवण्याची आमची योजना आहे, खगोल शास्त्रावर काम करण्याचा विचार आहे. पेटीतून येत नसलेलं कोणतं पुस्तक वाचायचं आहे का, असंही मुलांना आम्ही विचारायला लागलो. त्यालाही उत्तम प्रतिसाद आला. मार्क झुकरबर्गवरचं पुस्तक हवंय असं मुलांनी सांगितलं. विज्ञानविषयक पुस्तकं मुलं खूप वाचत आहेत, चरित्रं चांगली वाचत आहेत. 'मनोविकास'ची सुपरहिरो मालिका मुलांनी आवडीने वाचली. पियूची वही, हॅनाची सुटकेस, एक होता कार्व्हर ही पुस्तकं मुलं खूप वाचतात. अकबर बिरबल, तेन्नाली रामा यांच्या गोष्टी अजूनही खूप वाचली जातात. साधना, किशोर, छात्रप्रबोधन, पासवर्ड हे दिवाळी अंकही आम्ही शाळांमध्ये दिले. या पुस्तकांवरून प्रेरित होऊन मुलांनी स्वत: कविता करून त्यांची छोटी पुस्तकं काढली आहेत.

**एक उपक्रम म्हणून सुरू केलेल्या 'पुस्तक पेटी'ला वाचन चळवळीचं स्वरूप कसं येत गेलं?**

उपक्रमाला दहा वर्षं झाल्यानंतर डेटा संकलनावर काम




*तब्बल १० वर्ष पुस्तक पेटीसारखा उपक्रम सुरु राहतो. केवळ सुरु राहतो एवढेच नव्हे तर प्रकाशन संस्था आणि समाजातले इतरही सहृद या उपक्रमात आपला सहभाग नोंदवतात. म्हटली, तर ही उमेद देणारी घटना ठरते...*

केलं. पुस्तक पेटी पाठवताना त्यातल्या पुस्तकांची एक यादी पेटीत ठेवली जाते आणि तिची एक प्रत माझ्याकडेही असते. त्यामुळे सुरुवातीपासून कोणती पुस्तकं दिली याची नोंद माझ्याकडे होतीच. शाळांची नावं मी आठवून लिहून काढली. त्यावेळी १६० पेट्या सध्या फिरत असल्याचं लक्षात आलं. काही शाळांमध्ये पेटी दोनदा किंवा तीनदा गेली, हे गृहीत धरलं तरी सुमारे १०० शाळांपर्यंत पुस्तक पेटी नक्कीच पोहोचली आहे. यात दुसरं म्हणजे, सगळ्या १६० पेट्या फक्त आमच्या पुस्तकालयातर्फे पाठवल्या गेलेल्या नाहीत. काही संस्थांनी यात सहभागी होण्याची तयारी दाखवली. त्यांना पुस्तक पेटी आम्हीच तयार करून दिली पण ती पोहोचवण्याचं काम त्यांनी केलं. अंबाजोगाईच्या मानवलोक संस्थेतल्या मनस्विनी प्रकल्पाने महाविद्यालयीन मुलांसाठी पुस्तक पेट्या वितरित केल्या. त्यात स्पर्धा परीक्षा, करिअर मार्गदर्शन, स्त्री-पुरुष समानता आदी विषयांवरची पुस्तकं होती. आणखीही काही संस्थांनी आमच्याशी संपर्क केला. माजलगावच्या 'जाणिवा' नावाच्या संघटनेने चार पेट्या घेतल्या. पेटी तयार आम्ही करून देतो, पण पुढची प्रक्रिया या संस्था पार पाडतात. शेवटी एका व्यक्तीला किंवा गटाला मर्यादा आहेत. अंबाजोगाईबाहेर हा उपक्रम न्यायचा असेल, तर बाकी संस्थांची मदत घेणं गरजेचंच आहे.

**उपक्रमाचा विस्तार करताना पेटीतल्या पुस्तकांच्या निवडीबाबत काय भूमिका ठेवली?**

पुस्तकांच्या निवडीबाबत धोरण ठाम होतं. नवीन पुस्तकांचा शोध घेणं माझ्या कामाचा भाग आहे आणि गेल्या दहा वर्षांच्या अनुभवामुळे मुलांना कोणती पुस्तकं दिली गेली पाहिजेत, याचाही अंदाज आला आहे. त्यामुळे निवडीचा निर्णय आम्ही आमच्याकडेच ठेवला आहे. म्हणूनच प्रायोजकत्वही रोख स्वरूपात घेतो, पुस्तकांच्या स्वरूपात घेत नाही. सुरुवातीला एका पेटीसाठी साधारण पाच हजार रुपये किमतीची पुस्तकं लागत होती. एवढी रक्कम देऊ शकतील, असे मित्र मंडळींमध्येच बरेच जण असल्यामुळे प्रायोजक मिळवण्यात अडचण आली नाही. आता पुस्तकांच्या किमती जरा वाढल्याने माध्यमिक गटाच्या पेटीसाठी सात हजार रुपयांची पुस्तकं लागतात.

दिलीपराज प्रकाशन आणि राजहंस प्रकाशनचे अप्रूप देशपांडे यांचा अनुभव फार चांगला होता. त्यांनी पेट्या प्रायोजित केल्या, पण आमच्या प्रकाशनांची पुस्तकं त्यात टाका असा आग्रह अजिबात धरला नाही. सातारा जिल्ह्यातही आमच्या उपक्रमाखाली पेट्यांचं वितरण झालं, पण त्याही पेट्या अंबाजोगाईहूनच तयार करून पाठवल्या होत्या. अंबाजोगाईपासून ५० किलोमीटर अंतरातल्या वितरणाची जबाबदारी आपण घ्यायची आणि त्यापलीकडे जाण्यासाठी आम्ही शिक्षकांचे गट तयार केले आहेत. त्यातल्या एका शिक्षकाला 'ग्रंथ मित्र' असं संबोधलं जातं. त्यांनी तीन ते पाच पेट्यांची जबाबदारी घेणं अपेक्षित आहे.

**मुलांना पुस्तकं देताना अनेकदा 'हे मुलांना समजणार नाही' असं गृहीत धरल्याने उगाचच मर्यादा घातल्या जातात. तुमचं धोरण याबाबत कसं होतं?**

काही वेळा पुस्तक वाचल्यानंतर हे मुलांना समजेल की नाही असं वाटतं, त्यावर मैत्री गटाच्या सदस्यांमध्ये चर्चाही होते. मात्र, 'देऊन तर बघू' हे धोरण आम्ही ठेवतो आणि मुलं हमखास सुखद आश्चर्याचे धक्के देतात. गुलजार यांचं 'बोस्कीच्या कथा' हे पुस्तक ग्रामीण भागातल्या मुलांना आवडेल की नाही असं वाटत होतं, तरीही संभाजीराव बंडगिरे हायस्कूलमध्ये पाठवलेल्या पेटीत या पुस्तकाच्या तीन प्रती टाकल्या. पेटी परत आल्यानंतर त्या प्रतींची अवस्था बघूनच ते सगळ्यात जास्त वाचलं गेल्याचं लक्षात आलं. हाच अनुभव सत्यजित रे यांच्या 'फेलुदा'बाबत आला. शोधांच्या कथा मुलं खूप वाचतात. 'बहुरूप गांधी' हे पुस्तक मुलांना खूप आवडलं. त्यातून स्वावलंबनाचे धडे मुलांनी घेतले आणि प्रत्यक्षात आणले. ओरिगामीच्या पुस्तकामुळे मुलं सातत्याने ओरिगामीच्या वस्तू करायला लागली. ही प्रक्रिया तशी संथ आहे. शाळेतल्या सगळ्याच्या सगळ्या मुलांनी पुस्तकं वाचली असंही काही होत नाही. मात्र, वाचण्याची इच्छा असलेल्या मुलापर्यंत पुस्तक पोहोचलं पाहिजे, हा उद्देश काही प्रमाणात नक्कीच सफल होत आहे.

**गेल्या दहा वर्षांच्या काळात मुलांच्या वाचनाचे पॅटर्न्स बदलल्याचं तुमचं निरीक्षण आहे का? या उपक्रमाच्या भवितव्याकडे तुम्ही कसं बघता?**

लॉकडाउनच्या काळात मोबाइल फोन बघण्याचं प्रमाण ग्रामीण भागातही वाढलं. पेटीतली पुस्तकं वाचून पूर्ण व्हायला जो वेळ लागत होता, तो यामुळे वाढला आहे. मात्र, वाचनाची आवड लावण्याचे प्रयत्न सातत्याने करत राहिलं पाहिजे. यासाठी आम्ही शब्दांचे खेळ घेतो, मुलांना वाचलेल्या गोष्टी सांगायला लावतो. त्यात काही छान अनुभव येतात. लमाण तांड्याजवळच्या जिल्हा परिषदेच्या एका शाळेतल्या एका मुलीने वाचलेली गोष्ट तिच्या भाषेत खूप छान रंगवून सांगितली. आम्ही अंबाजोगाईत दोन बालकुमार साहित्य संमेलनं घेतली आणि सूत्रसंचालनाची सगळी जबाबदारी मुलांवर सोपवली.

वाचनाचं प्रमाण एकंदर कमी होत चाललं आहेच. तरीही आता दहा वर्षांनंतर उपक्रम थांबवावा, असं वाटण्यासारखी परिस्थितीही अजिबात नाही. चांगली पुस्तकं मुलांपर्यंत पोहोचवली गेली, तर ती वाचली जातातच. फक्त त्यासाठी शिक्षकांनी वेळ दिला पाहिजे, ग्रंथ निर्मिती व्यवसायातल्या लोकांनी वेळ दिला पाहिजे. मुलं वाचून व्यक्त होतात, ते ऐकण्यासाठी वेळ दिला पाहिजे. या प्रक्रियेतून होणारा फरक तसा सूक्ष्म आहे, तो मोजता येत नाही, पण वाचनामुळे मुलं समृद्ध झाल्याचे अनुभव खूप जणांनी सांगितले. दहा वर्षं झाल्यानंतर आम्ही जो कार्यक्रम केला, त्यानंतर खूप शाळांनी आम्हाला संपर्क केला आणि पुस्तकपेटीची मागणी केली. याचा अर्थ हा उपक्रम राबवण्यास आणखी खूप वाव आहे हे नक्की.

**लेखिका, अनुवादिका असलेल्या सायली परांजपे यांची 'राया' (अनुवादित), 'शहीद भगतसिंग', 'क्रांतिज्योती सावित्राबाई फुले', 'सम्राट अशोक' ही लघुचरित्रपर पुस्तके प्रकाशित आहेत. त्या समतावादी मुक्त संवाद पत्रिकेच्या सल्लागार संपादक मंडळाच्या सदस्या आहेत.**

**संपर्क:** sayalee.paranjape@gmail.com

**पुस्तक पेटी या उपक्रमासंबंधांत अधिक माहितीसाठी वाचक अभिजित जोंधळे यांच्याशी पुढील क्रमांकावर संपर्क करू शकतात. संपर्क : ९४२३४ ७१०७०, ९१४६७ २२९००**